# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-५२ दिनांक - २०/०२/२०२४

**अंदाजे रु. १६ लाख रोख रक्कम चोरी करणारे तीन सराईत आरोपीतांना सुरेंद्रनगर, गुजरात येथुन अटक - वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी**

फिर्यादी हे दिनांक १४/०२/२०२४ रोजी १५.३० वा. चे सुमारास सलमान सुपारी स्टोअर्स, रेंजनाका, वसई पुर्व ते रेंजनाका सिग्नल, वसई पुर्व, जि. पालघर चे दरम्यान बजाज ॲपे गाडीने जितेंद्र कॉर्पोरेशन कंपणीची रु. १५,९९,१३३/- रोख रक्कम असलेली बॅग घेवुन जात असताना सदर बॅग ही बजाज ॲपे गाडीत पाठीमागे कुलुप लावुन ठेवलेली असताना कोणीतरी अज्ञात आरोपी याने चालु गाडीचे मागील दरवाजाचे कुलुप तोडुन त्यामधील रोख रक्कम ठेवलेली बॅग चोरुन नेली म्हणुन गु.र.क्र. ९६/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी हे मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई परिसरामध्ये वारंवार अशाप्रकारचे गुन्हे करत असल्याने मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वालीव गुन्हे प्रकटीकरण पथकास आरोपींचा शोध घेण्याबाबत मार्गदर्शक सुचना दिल्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाने सि.सि.टि.व्ही. कॅमेऱ्यांच्या आधारे व तांत्रिक मदतीच्या आधारे आरोपींना निष्पन्न करुन आरोपी नामे १) नितेश ऊर्फ पोया धरमशी बुटीया, वय ३६ वर्ष, धंदा- मसाला विक्री, रा. गाव- तावी, लिंबडी-तावी रोड, इंडीयन ऑईल पेट्रोल पंप समोर, तलावाच्या बाजुला, तहसिल/थाना- लकतर, जि. सुरेंद्रनगर, गुजरात, २) दिलीप ऊर्फ कालीया करसन भोजीया, वय २८ वर्षे, धंदा- साडी विक्री, रा. गाव- नवी मोरवाड, बोगावा नदीजवळ, हरीजन वस्ती समोर, तहसिल/थाना- चुडा, जि. सुरेंद्रनगर, गुजरात, ३) भरत ऊर्फ मिठीया धिरु बुटीया, वय ३८ वर्षे, धंदा- नाही, रा. गाव- शियानी, परेशभाई दुकानासमोर, वाघरी वास परीसरत, तहसिल/थाना- लिंबडी, जि. सुरेंद्रनगर, गुजरात व गाव- अडवाल, मयाभाई अलु सुरेला यांच्या घरी, वाघरीवास, तहसिल/थाना- धंधुका, जि. अहमदाबाद यांनी केले व लिंबडी, जि. सुरेंद्रनगर, गुजरात येथुन सापळा रचुन शिताफीने अटक केली आहे.अटक आरोपीत यांनी मिरा-भाईदर, वसई-विरार परिसरामध्ये अशाचप्रकारचे अनेक गुन्हे केल्याची तपासात निष्पन्न झाले आहे. इकडील आयुक्तालयातील एकूण ३ गुन्हे उघड झाले आहेत. त्याचेकडुन एकुण रु. ०९,०५,०००/- रोख रक्कम जप्त केली आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. | गु.र.क्र. ९६/२०२४ कलम ३७९,३४ भा.दं.वि. |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. | गु.र.क्र. २८८/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि. |
| ३. | काशिमीरा पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. | गु.र.क्र. १५३/२०२३ कलम ३७९,३४ भा.दं.वि. |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. उमेश माने-पाटिल, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.